RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १३(३)] सोमवार, जुलै ३, २०२३/आषाढ १२, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ जुलै २०२३.

### अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि. २०१८/प्र .क्र. ८९/विशि-२.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम ७१ चे पोट-कलम (५) तसेच कलम ७२ चे पोट-कलम (१०) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, यांद्वारे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विद्यापीठ प्राधिकरणांच्या बैठकींमधील कामकाज चालविण्याबाबतच्या कार्यपद्धतीशी संबंधित एकरुप परिनियम विहित करीत आहे, एकरुप परिनियम, २०१९ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या परिनियमांस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठ प्राधिकरणांच्या बैठकींमधील कामकाज चालविण्याबाबतच्या कार्यपद्धती) (पहिली सुधारणा) एकरूप परिनियम, २०२३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठ प्राधिकरणांच्या बैठकींमधील कामकाज चालविण्याबाबतच्या कार्यपद्धती) एकरुप परिनियम २०१८, याच्या कलम २ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :—

(१) पोट-कलम १ मधील "चाळीस पूर्ण दिवस" ऐवजी "पंधरा पूर्ण दिवस" असा बदल करण्यात येत आहे.

(२) पोट-कलम २ मधील "तीस पूर्ण दिवस" ऐवजी "दहा पूर्ण दिवस" असा बदल करण्यात येत आहे.

(३) पोट-कलम ३ मधील "पंचवीस पूर्ण दिवस" ऐवजी "सात पूर्ण दिवस" असा बदल करण्यात येत आहे.

(४) पोट-कलम ४ मधील "पंधरा पूर्ण दिवस" ऐवजी "पाच पूर्ण दिवस" असा बदल करण्यात येत आहे.

(५) पोट-कलम ५ मधील "पाच पूर्ण दिवस" ऐवजी "तीन दिवस" असा बदल करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठ प्राधिकरणांच्या बैठकींमधील कामकाज चालविण्याबाबतच्या कार्यपद्धती) एकरूप परिनियम, २०१९, याच्या कलम ९७ नंतर खालीलप्रमाणे कलम ९८ चा समावेश करण्यात येत आहे :—

९८. बैठकीची सूचना देण्याची कार्यपद्धती :—

विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांच्या संबंधित सदस्यांना पत्र किंवा ई-मेल किंवा व्हॉटसॲप किंवा लघु संदेश सेवा या माध्यमातून देण्यात येणारी बैठकींची सूचना योग्य रित्या देण्यात आल्याचे मानले जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजित बाविस्कर,**
शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 3rd July 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. Parini-2018/C.R.89/UE-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with sub-section (*5*) of section 71 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah.VI of 2017) the Government of Maharashtra hereby amends the Maharashtra Public Universities (Procedure for conduct of business at the Meetings of Authorities of the University) Uniform Statute, 2019, as follows, namely :—

(*1*) This Statute may be called as the Maharashtra Public Universities (Procedure for conduct of business at the meetings of the Authorities of the University) (First Amendment) Uniform Statute, 2023.

(*2*) In clause 2 of the Maharashtra Public Universities (Procedure for conduct of business at the meetings of the authorities of the University) Uniform Statute, 2019,—

(*i*) in sub-clause (1) for the words "forty clear days", the words "fifteen clear days" shall be substituted.

(*ii*) in sub-clause (2) for the words "thirty clear days", the words "ten clear days" shall be substituted.

(*iii*) in sub-clause (3) for the words "twenty-five clear days", the words "seven clear days" shall be substituted.

(*iv*) in sub-clause (4) for the words "fifteen clear days", the words "five clear days" shall be substituted.

(*v*) in sub-clause (5) for the words "five clear days", the words "three clear days" shall be substituted.

(*3*) After clause 97 of the Maharashtra Public Universities (Procedure for conduct of business at the meetings of the authorities of the University) Uniform Statute, 2019, the following clause shall be inserted namely :—

98. mode of delivery for notice of meeting :—

Notice of meeting of all the authorities of the University, served to the concerned members through letter or e-mail or whatsapp or short messaging service (sms), will be deemed to be properly delivered.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT BAWISKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.